MHKO110007542017

**नियमित दिवाणी दावा क्र. ७८/२०१७.**
(CNR No.**MHKO110007542017)**

**निशाणी क्र. ६५ खालील आदेश**

०१. प्रस्तुत अर्ज वादींनी दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश १ नियम १० अन्वये प्रस्तुत दाव्यामधून वादी क्र.२ - श्रीमती बिसमिल्ला नुरुद्दीन नायकवडी यांचे नांव कमी करण्यासाठी केला आहे.

०२. वादींचे अर्जातील कथन की, प्रस्तुत दावा हा त्यांनी प्रतिवादी यांच्या विरुद्ध हस्तांतरण कायदा कलम ६०, ३८ व ३४ प्रमाणे तारण गहाण सोड होवून मिळण्यासाठी दाखल केला आहे. प्रस्तुत दाव्यामधील वादी क्र.२ श्रीमती बिसमिल्ला नुरुद्दीन नायकवडी ह्या दिनांक ०५/०२/२०२४ रोजी मयत झाल्या असून, त्यांचे कायदेशीर वारस असणारे वादी क्र.३, ७ व ८, हे यापूर्वीच दाव्यात वादी म्हणून समाविष्ट आहेत. त्यामुळे, वादींनी मयत वादी श्रीमती बिसमिल्ला नुरुद्दीन नायकवडी यांचे नांव दाव्यातून कमी करण्याची विनंती केली आहे.

०३. प्रतिवादी यांनी प्रस्तुत अर्जावर त्यांचे म्हणणे सादर करून प्रस्तुत अर्जाच्या कामी त्यांचा कोणताही आक्षेप नसल्याचे कथन केले आहे.

०४. प्रकरणातील सर्व कागदपत्रांचे अवलोकन केले. तसेच, दोन्ही बाजुच्या विधिज्ञांचा युक्तिवाद ऐकला.

०५. अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, वादी यांनी प्रस्तुत दावा त्यांनी प्रतिवादींच्या विरुद्ध हस्तांतरण कायदा कलम ६०, ३८ व ३४ प्रमाणे तारण गहाण सोड होवून मिळण्यासाठी दाखल केला आहे. तसेच, वादींच्या कथानानुसार, वादी क्र.२- श्रीमती बिसमिल्ला नुरुद्दीन नायकवडी ह्या दिनांक ०५/०२/२०२४ रोजी मयत झाल्या असून, त्यांना वादी क्र. ३, ७ व ८, हे सरळ व कायदेशीर वारस आहेत. त्यामुळे वादी क्र.२ हिचे नांव दाव्यातून कमी करणे आवश्यक आहे. तसेच वादी क्र.२, हिचे नांव प्रस्तुत दाव्यातून कमी केल्यास कोणत्याही पक्षकाराचे नुकसान होत नाही किंवा दाव्याच्या स्वरुपात देखील कोणताही बदल होत नाही.

०६. दिवाणी दाव्यामध्ये वादी हा दाव्याचा मालक असतो, तसेच तो आवश्यक

पक्षकारास दाव्यामध्ये सामील करू शकतो अथवा आवश्यकता नसलेल्या पक्षकारास दाव्यामधून काढून टाकू शकतो. वादी यांनी त्यांच्या कथनांच्या पुष्ट्यर्थ **निशाणी क्र.६६** चे यादी सोबत मयत वादी क्र.२ श्रीमती बिसमिल्ला नुरुद्दीन नायकवडी यांच्या मृत्यूचा दाखल्याची छायांकित प्रत हजर केली आहे. सदर मृत्यू दाखल्याचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, वादी क्र.२ श्रीमती बिसमिल्ला नुरुद्दीन नायकवडी ह्या दिनांक ०५/०२/२०२४ रोजी मयत झाल्या आहेत. तसेच, वादी यांच्या कथनानुसार त्यांचे सरळ व कायदेशीर वारस हे यापूर्वीच दाव्यात सामील आहेत. प्रतिवादींनी देखील प्रस्तुत अर्जावर त्यांचे म्हणणे दाखल करून, प्रस्तुत अर्जाबाबत त्यांचा कोणताही आक्षेप नसल्याचे कथन केले आहे. त्यामुळे, वादी क्रमांक २, यांचे नांव दाव्यातून कमी केल्यास प्रतिवादी यांना कोणतीही अडचण निर्माण होणार नाही किंवा दाव्याच्या स्वरुपात देखील कोणताही बदल होणार नाही. त्यामुळे, वरील सर्व गोष्टींचा विचार करता, मी खालील आदेश पारित करत आहे. -

## आदेश.

१. वादी यांचा **निशाणी क्र.६५** वरील अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२. वादी यांना प्रस्तुत दाव्यातून वादी क्र.२ श्रीमती बिसमिल्ला नुरुद्दीन नायकवडी, यांचे नांव कमी करण्यास परवानगी देण्यात येत आहे.

३. वादींनी प्रस्तुत अर्जात नमूद केल्यानुसार दावा दुरुस्ती करून, दाव्याची दुरुस्ती प्रत अभिलेखावर सादर करावी.

४. येणेप्रमाणे अर्ज निकाली काढण्यात येत आहे.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by LYAKATALI MUBARAK PATHAN
Date: 2024.11.28 16:45:32 +0530

(एल. एम. पठाण)

दिनांक. २८/११/२०२४. दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, पेठ वडगांव